# सोलापूर विद्यापीठ

**अभ्यासमंडळे विभाग**

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर. ४१३ २५५

ईपीएबीक्स : ०२१७-२७४४७७८ (११ लाईन्स)

विस्तृत क्र. ११३ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०

संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in

ई-मेल : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University

**Board of Studies**

Solapur-Pune National Highway,
Kegaon, Solapur-413 255
EPABX No. 0217- 2744778 (11 lines)
Ext. No. 113. Fax No.0217-2744770
Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
E-mail : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in


संदर्भ क्र. सोविसो/अमवि/२०१८/8038

दिनांक : 15 SEP 2018

प्रति,

मा. प्राचार्य,

सर्व संलग्नित अभियांत्रिकी, फॉर्मसी व आर्किटेक्चर महाविद्यालये,

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०१२-१३ किंवा त्यापूर्वी अभियांत्रिकी/फार्मसी/आर्किटेक्चर अभ्यासक्रमास प्रवेशित असुन सद्यस्थितीत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत.**

संदर्भ

१ दि. ०६/०९/२०१८ रोजी मा.सहयोगी अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्व अभियांत्रिकी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष/समन्वयक, यंत्रणा विश्लेषक परीक्षा विभाग, उपकुलसचिव परीक्षा विभाग यांच्या संयुक्त बैठकीत ठराव क्र. १ ते ३

२ दि.०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीतील ठराव क्र.२.

३ मंजूर कार्यालयीन टिपणी दि. ११/०९/२०१८.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन दि. ०६/०९/२०१८ रोजी झालेल्या मा.सहयोगी अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्व अभियांत्रिकी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष/समन्वयक, यंत्रणा विश्लेषक परीक्षा विभाग, उपकुलसचिव परीक्षा विभाग यांच्या संयुक्त बैठकीत खालीलप्रमाणे ठराव क्र. १ ते ३ पारित झालेले आहेत.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १ | जे विद्यार्थी शै. वर्ष २०१२-१३ किंवा त्यापूर्वी प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास, फॉर्मसी अभ्यासक्रमास किंवा ऑर्किटेक्चर या अभ्यासक्रमास प्रवेशीत असून काही विषयात अनुत्तीर्ण झालेले आहेत. तसेच शै. वर्ष २०१३-१४ मध्ये अभियांत्रिकी /फॉर्मसी अभ्यासक्रमास थेट द्वितीय वर्षास प्रवेशीत असून काही विषयात अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वीच्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्यासाठी ऑक्टोबर/नोव्हेंबर - २०१८ आणि मार्च / एप्रिल -२०१९ या शेवटच्या दोन संधी देण्यात याव्यात व तदनंतर सदर विषयाची परीक्षा विद्यापीठाकडून घेण्यात येवू नये, असे ठरले. |
| ठराव क्र. २ | अभियांत्रिकीमध्ये येणाऱ्या सर्व अभ्यासमंडळानी अभ्यासक्रम सुधारीत करताना पूर्वीच्या सर्व अभ्यासक्रमाच्या विषयाचे समकक्ष विषय देणे अनिवार्य आहे. कोणत्याही विषयासाठी No Equivalence असे नमूद करु नये, असे ठरले. |
| ठराव क्र. ३ | शै.वर्ष २०१८-१९ मध्ये अभियांत्रिकी भाग-१ चा अभ्यासक्रम सुधारीत केलेला असल्याने शै.वर्ष २०१७-१८ व त्यापूर्वी प्रवेश घेतलेल्या तथा अभियांत्रिकी भाग-१ मध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑक्टोबर / नोव्हेंबर २०१८ आणि मार्च / एप्रिल -२०१९ या शेवटच्या दोन संधी देण्यात याव्यात व तदनंतर सदर विषयांची परीक्षा विद्यापीठाकडून घेण्यात येवू नये, असे ठरले. |

उपरोक्त ठरावानुसार कार्यवाही करण्याबाबतची बाब दि.०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीत ठराव क.२. अन्वये स्विकारण्यात आलेले आहेत.

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ किंवा त्यापूर्वी अभियांत्रिकी / फार्मसी / आर्किटेक्चर अभ्यासक्रमास प्रवेशित असून सद्यस्थितीत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्या संदर्भात उपरोक्त ठराव क्र.१, २, ३ नुसार कार्यवाही (अंमलबजावणी) करण्यात यावी. तसेच सदरची माहिती संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास संबंधित महाविद्यालयाने आणावे हि विनंती.

आपला विश्वासू,

प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

प्रत : मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.

# सोलापूर विद्यापीठ

अभ्यासमंडळे विभाग
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर- ४१३ २५५
ईपीएबीएक्स : ०२१७-२७४४७७८ (११ लाईन्स)
विस्तृत क्र. ११३ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University

**Board of Studies**
Solapur-Pune National Highway,
Kegaon, Solapur-413 255
EPABX No. 0217-2744778 (11 lines)
Ext. No. 113. Fax No.0217-2744770
Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
E-mail : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in


संदर्भ क्र. सोविसो/अमवि/२०१८/ 8025 दिनांक 14 SEP 2018

अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
(अभियांत्रिकी, फॉर्मसी, एम.बी.ए व आर्किटेक्चर महाविद्यालये वगळून)
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय** :- **२०१० पॅटर्नमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत.**

संदर्भ १ दि.०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीतील ठराव क्र.१.

२ मंजूर कार्यालयीन टिपणी दि. ११/०९/२०१८.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन दि. ०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीत खालीलप्रमाणे ठराव क्र.१ पारित झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १ | २०१० पॅटर्नमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.<br>१. अभियांत्रिकी, फार्मसी, शिक्षणशास्त्र, विधी हे अभ्यासक्रम व सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रम वगळून २०१० पॅटर्नमधील जे विद्यार्थी प्रथम वर्षास अनुत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी कोणतीही संधी देऊ नये असे ठरले.<br>२. २०१० पॅटर्नमधील जे विद्यार्थी द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेशित आहेत पण ते प्रथम / तृतीय वर्षातील काही विषयात अनुत्तीर्ण आहेत. अशा विद्यार्थ्यांना ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१८ व मार्च /एप्रिल २०१९ या दोनच संधी देण्यात याव्यात तथापि संबंधित विद्यार्थ्यांनी चालू अभ्यासक्रमानुसार (समकक्षतेनुसार) परीक्षा देणे बंधनकारक आहे तसेच सदर विद्यार्थ्यांना या नंतर कोणतीही संधी देऊ नये असे ठरले.<br>त्याचप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांकडून उपरोक्त नमूद केलेल्या दोन संधी नंतर परत कोणतीही संधी मागणार नाही अशा आशयाचे हमी पत्र प्राचार्यांमार्फत विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे.<br>३. २०१० पॅटर्नमधील द्वितीय वर्षात मार्क सिस्टीममध्ये परीक्षेला बसलेल्या विद्यार्थी वरीलप्रमाणे दिलेल्या दोन संधीत (ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१८ व मार्च /एप्रिल २०१९) सर्व विषयात उत्तीर्ण न झाल्यास त्याची संबंधित अभ्यासक्रमाची संपादणूक (Performance) रद्द करावे असे ठरले.<br>४. २०१० पॅटर्नमधील जे विद्यार्थी मार्क. सिस्टीम तृतीय वर्षामध्ये आहेत अशा विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद संधीत (ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१८ व मार्च /एप्रिल २०१९) तृतीय वर्ष पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर संधीत अनुत्तीर्ण झाल्यास सदर विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या संपादणूक (Performance) रद्द करण्यात येईल.<br>५. अनुक्रमाक १ ते ४ मध्ये दिलेल्या संधीस अनुसरुन परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी नविन अभ्यासक्रमानुसार समकक्षते नुसार परीक्षेस बसणे आवश्यक आहे.<br>६. **पॅटर्न २००९ व त्यापूर्वीच्या विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना** यापूर्वीच विशेष बाब म्हणून ऑक्टोबर /नोव्हेंबर २०१७ व मार्च /एप्रिल २०१८ या दोन अधिकच्या संधी देण्यात आलेल्या होत्या तसेच सदर संधी देते वेळेस या संधीमध्ये मी अनुत्तीर्ण झाल्यास विद्यापीठाकडे सदर विषयामध्ये संधी मागणार नाही असे विद्यार्थ्यांनी स्वयःघोषणा पत्र घेण्याबाबत संबंधित प्राचार्यांना कळविण्यात आले होते.<br>वरील बाब विचरात घेता २००९ व त्यापूर्वीच्या विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वरील प्रमाणे संधी देऊनही अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कोणतेही संधी देऊ नये असे ठरले. उपरोक्त प्रमाणे अनुक्रमाक १ ते ६ ची विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली. |

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की २०१० पॅटर्नमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसदर्भात उपरोक्त ठराव क्र.१ मधील मुद्दा क्र. १ ते ६ नुसार कार्यवाही (अंमलबजावणी) करण्यात यावी. तसेच सदरची माहिती संबंधित विद्यार्थ्यांच्या निर्देशनास आणावी, ही विनंती.

आपला विश्वासु,

प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक, संशोधन आणि विकास